**आर बी आय/२००५-०६/१७४**
डि जी बी ए, जी ए डी. सं. एच ३०९५/४१.०७.००१/२००५-०६

ऑक्टोबर ०६, २००५

अध्यक्ष आणि प्रबंध निदेशक/प्रबंध निदेशक
सर्व प्रतिनिधी बँका

प्रिय महोदय,

**शासकीय कारभार चालविणे - करदात्यांना इ - पेमेंट सुविधेची उपलब्धता - इंटरनेट बँकींगसाठी दिशा-निर्देश**

शासकीय खात्यांच्या वतीने कर जमा करण्यासाठी इ-पेमेंट व्यवस्था सुरु करण्याची परवानगी मागण्यासाठी अनेक प्रतिनिधी बँका आमच्याकडे विचारणा करीत आहेत.

२. या संदर्भात आमचा असा विचार आहे की, इ-पेमेंट मुळे ग्राहकांना होणारा फायदा शासन आणि त्यांच्या ग्राहकांना देखील मिळावा. आम्ही आमच्या बँकींग परिचालन आणि विकास विभागाने, दिनांक २०जुलै २००५ च्या परिपत्रक सं. आर बी आय/००५-०६/७१ द्वारे जारी केलेले दिशा-निर्देश आपल्या दृष्टिस आणू इच्छितो. (हे आमच्या www.rbi.org.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत).

३. वर सांगितल्यानुसार, आम्ही सूचित करतो की, शासकीय खात्यांच्या वतीने इ-पेमेंट ची सुविधा उपलब्ध करताना प्रत्येक वेळी आमच्या पूर्वसंमतीची आवश्यकता नाही. आपण बॅकिंग परिचालन आणि विकास विभागाच्यावर उल्लेखलेल्या दिनांक २० जुलै, २००५ च्या परिपत्रकानुसार निर्णय घ्यावा.

४. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू

(गिरिश कल्याणपूर)
उप महा व्यवस्थापक